# रामपूर येथे आरोग्य शिबीर संपन्न

देगलूर (म.नेता)

अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित देगलूर महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वार्षिक विशेष युवक शिबीर मौजे-रामपूर येथे उपजिल्हा रुग्णालय,देगलूर यांच्या सौजन्याने आरोग्य शिबिर संपन्न झाले.या शिबिरात ग्रामस्थ व विद्यार्थ्यांची आरोग्य तपासनी करुण औषधी देन्यात आले. कुष्ठरोग, टी.बी., अनेमीया, एन.सी.डी दंतरोग,सीकलसेल टेस्टींग, बी.पी.,शुगर इत्यादी आजाराबावत तपासणी करण्यात आली सोबतच विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले.

या आरोग्य शिबिरात वैद्यकीय अधीक्षक डॉ. नरेश देवनीकर यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. संजय इंगळे,डॉ. शहानवाज शेख, डॉ.फारुकी एफ. एक. , डॉ.सावळे जी.स.,डॉ.मोना ओहळ,कु.जयश्री बाबळे,सौ. छाया पाटील, विनायक पाटील, श्रीमती शेख एस.एस., श्रीमती रेखा कांबळे इत्यादी जिल्हा रुग्णालयातील टीमने राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरास भेट देऊन गावकऱ्यांची व राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवकांची आरोग्य तपासणी केली.डॉ.ओहळ यांनी गूटखा व तंबाखू जन्य पदार्थ सेवनामुळे होनारे दुष्परिणाम या बदल विस्तृत मार्गदर्शन केले सोबतच बाबळे यांनी सीकलसेल या आजारांबाबत मार्गदर्शन केले.मानसिक आरोग्य चांगले राहण्यासाठी मोबाईलचा अतिवापर टाळावा असे आवाहन सौ.पाटिल यांनी केले. या शिबिरास प्रा काळे व्ही एन , डॉ खंदकुरे व्यंकट प्रा गणेश क्यादारे व सरपंच सौ स्नेहा पांडवे , ग्रामस्थ यांनी परिश्रम घेतले.

Scanned with OKEN Scanner